आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या विविध जिल्ह्यात जोरदार पाऊस; नंदुरबार, नाशिक, बीडसह अनेक भागातली पीकं संकटात

- राज्यभरातल्या बाजार समित्यांचा उद्या एकदिवसीय बंद

- देशभरात गोकुळाष्टमीचा उत्साह; राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

**आणि**

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, खासदार वसंतराव चव्हाण यांचं निधन

**<><><><><><>**

राज्यात आजही विविध जिल्ह्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. **नंदूरबार** जिल्ह्यातल्या शहादा शहरात मुसळधार पाऊस झाला असून सुसरी धरणातून गोमाई नदीत विसर्ग सुरु आहे. गेल्या तीन दिवसांपासून जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक तालुक्यातल्या शेतांमध्ये पाणी शिरलं आहे. या पावसामुळे जिल्ह्यातल्या केळी, पपई आणि कापसाच्या पिकाला धोका निर्माण झाला आहे. **नाशिक** जिल्ह्यातल्या सुरगाणा, पेठ, त्र्यंबक या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून ग्रामीण भागात अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. तसंच अनेक तालुक्यांमध्ये पिकांचं नुकसान झालं आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यातल्या दहा धरणांमधून विसर्ग सुरू आहे. **बीड** जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाचं प्रमाण प्रचंड असल्यानं शेतीचं नुकसान झालं आहे. पावसाने रस्तेही पाण्याखाली गेल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. आष्टी तालुक्यात सततच्या पावसामुळे उडीद, कापूस, सोयाबीन, मूग, बाजरी, तूर, कांदा

आदी पिकं सडून गेली आहे. **धुळे** जिल्ह्यातल्या अक्कलपाडा धरणातून आज पुन्हा विसर्ग वाढवण्यात आला. त्यामुळे पांझरा नदीची पाणीपातळी आणखी वाढल्याने नदीवरचे तीन पूल वाहतुकीसाठी बंद केले आहेत. नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धुळे शहरातल्या मोती नाला, सुशी नाला यांची पाणी पातळी वाढून घरांमध्ये पाणी शिरलं आहे. या नाल्यांकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**सातारा** जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर असल्यानं सर्वच धरणातल्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे वाई इथल्या धोम आणि बलकवडी धरणातून कृष्णा नदीत विसर्ग सुरु आहे. मोरणा गुरेघर धरणातून आज दुपारी चार वाजता मोरणा नदीत पाणी सोडलं जाईल. तसंच, कण्हेर धरणातून वेण्णा नदीत पाणी सोडलं जाईल.

**<><><><><><>**

राज्यभरातल्या सर्व बाजार समित्यांनी उद्या बंद पुकारला आहे. द ग्रेन राइस अँड ऑइल सीड मर्चंट असोसिएशन - ग्रोमा चे सचिव भिमजी भानुशाली यांनी आज ही माहिती दिली. अन्नधान्यावर जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर लागू केल्यानं बाजार समितीकडून आकारला जाणारा सेस अर्थात नियमन कर रद्द करावा, जीएसटी कायदा सुटसुटीत करावा, यासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी हा एकदिवसीय बंद पुकारला आहे. याबाबत आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासोबत दुपारी मुंबईत बैठक होणार असून, या बैठकीत उद्याच्या बंदबाबत निर्णय होईल, असं भानुशाली यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राज्यभरातल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पॅनिक बटणं बसवण्याचा उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली आहे. तसंच शाळांमध्ये तक्रारपेट्या बसवण्याचं काम तातडीनं

पूर्ण करणार असून पोलिसांच्या उपस्थितीत या पेट्या उघडण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं काल घेतल्याचं त्यांनी आज वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. दरम्यान, या प्रकरणातल्या आरोपीची रवानगी १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

<><><><><>

भारत आणि श्रीलंका यांच्यातील संयुक्त सैन्य अभ्यासासाठी भारतीय नौदलाची आयएनएस मुंबई ही युद्धनौका आज कोलंबोत पोहोचली. श्रीलंकेच्या नौदलाने या युद्धनौकेचं उत्साहात स्वागत केलं. आयएनएस मुंबई या युद्धनौकेची या वर्षातील ही पहिली श्रीलंका भेट असून भारतीय नौदलाच्या जहाजाची ही आठवी श्रीलंका यात्रा आहे. या निमित्ताने भारत आणि श्रीलंका नौदलाचे काही संयुक्त कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ इथं कृषी विभागातर्फे आयोजित पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषि महोत्सव सुरू आहे. यात शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतील अशा कृषी प्रदर्शन, पशु प्रदर्शन यासारख्या अनेक दालनांचं प्रदर्शन या महोत्सवात भरवण्यात आलं आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी या कृषी महोत्सवाला आज भेट दिली. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या महोत्सवाला भेट देऊन नवनविन तंत्रज्ञान, कृषि अवजारे, कृषि विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान तसेच तज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा , असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

मुंबई- गोवा महामार्ग गणेशोत्सवापूर्वी वाहतुकीसाठी सुरळीत करावा अशा सूचना, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाच्या तांत्रिक सल्लागारांनी, संबधित विभागाला दिल्या आहेत. मुंबई-गोवा राज्य महामार्गाच्या अपूर्ण कामामुळे प्रवाशांना

होणाऱ्या त्रासाबाबत  खासदार रविंद्र वायकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिलं होतं.

<><><><><>

भगवद्गीतेतून विश्वाचं ज्ञान दिलेल्या श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी आज देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी होत आहे. मथुरेसह देशभरातल्या सर्वच मंदिरांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राज्यातल्या विविध मंदिरांमध्ये विशेष पूजा अर्चा आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. श्रीकृष्णाची मुर्ती, पाळण्यात बसवून हा सोहळा साजरा करण्याची प्रथा असून उद्या मुंबईसह विविध ठिकाणी गोविंदा पथके गल्लोगल्ली उभारलेल्या दहीहंड्या फोडण्यासाठी बाहेर पडतील. जन्माष्टमी निमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रातले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं आज पहाटे निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैद्राबादमधल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. उद्या सकाळी अकरा वाजता नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सरपंच, विधानपरिषद, विधानसभेचे सदस्य ते लोकसभेचे खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. याशिवाय शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रात त्यांनी महत्वाचं योगदान दिलं आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी चव्हाण यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे काँग्रेसने लढवय्या कार्यकर्ता आणि लोकप्रतिनिधी गमावल्याची भावना,  खरगे यांनी व्यक्त केली. काँग्रेसचे

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनीही वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

**<><><><><>**

ज्येष्ठ हार्मोनियम वादक पं. अनंत केतकर यांचं काल मुंबईत वृद्धापकाळानं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. चार दशकांपेक्षा जास्त काळ त्यांनी आकाशवाणीसाठी हार्मोनियम वादन केलं. तसंच अनेक विख्यात कलाकारांना साथसंगत करण्याची संधी त्यांना मिळाली. राज्यशासनाच्या सांस्कृतिक पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

भारत आणि सिंगापूर यांच्यातली दुसरी गोलमेज परिषद आज सिंगापूर मध्ये होत आहे. या परिषदेसाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्यासह वाणिज्य मंत्री पियूष गोयल, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्वीनी वैष्णव उपस्थित राहणार आहेत. सर्व मंत्रिगण सिंगापूरच्या मंत्र्यांबरोबर आणि नेत्यांबरोबर  दोन्ही देशामधील परस्पर सहकार्याबाबत चर्चा करतील. दोन्ही देशातील परस्पर सहकार्य वाढीसाठी यावेळी चर्चा होणार आहे. सिंगापूरमधून भारतात मोठ्या प्रमाणात थेट परकीय गुंतवणूक येत असते. गेल्या आर्थिक वर्षात सिंगापूरमधून भारतीय बाजारात ११ अब्ज अमेरिकन डॉलरहून अधिक गुंतवणूक करण्यात आली होती. आज सकाळी अर्थ मंत्री निर्मला सीतारमन यांनी सिंगापूरमध्ये आर्थिक कार्य कृतीदलाचे माजी अध्यक्ष टी. राजा कुमार यांची भेट घेतली. आपला अध्यक्षीय कार्यकाळ यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांनी राजा यांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

कल्याण इथं दहा वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. पीडिता आणि आरोपी एकाच परिसरात राहतात. दोन दिवसांपूर्वी

पीडिता आरोपीच्या घरात खेळायला गेलेली असताना त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. मुलीच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी धर्मेंद्र यादव याला अटक केली आहे. कल्याण जिल्हा सत्र न्यायालयाने यादव याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानेज यांच्याशी संवाद साधला. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातले संबंध आणि सहकार्य, तसंच क्वाडबद्दल यावेळी चर्चा झाल्याची माहिती प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली आहे.

<><><><><><>

लडाख या केंद्रशासीत प्रदेशात पाच नवे जिल्हे तयार करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज ही माहिती दिली. नव्या रचनेनुसार लडाखमध्ये जास्कर, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग हे पाच जिल्हे तयार केले जाणार आहेत.

<><><><><><>

ब्राझीलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मौरो वीईरा यांचं चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल नवी दिल्लीत आगमन झालं. वीईरा यांच्या भेटीमुळे भारत आणि ब्राझील यांच्या दरम्यान धोरणात्मक भागीदारीला चालना मिळेल, असं भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि मौरो वीईरा उद्या होणाऱ्या नवव्या भारत-ब्राझील कमिशनच्या बैठकीचं अध्यक्षस्थान संयुक्तपणे भुषवतील.

//<><><><><><>//